# प्रकरण दुसरे : साहित्याची निर्मितीप्रक्रिया

**माणूस आणि नवनिर्मिती :**

कोणतीही वस्तू जेव्हा निर्माण होते, तेव्हा ती निर्माण करणारा कोणीतरी **निर्माता** असतोच असतो. विश्व हे अनेकविध निर्मित वस्तूंनी भरलेले आहे. या वस्तूंची **निसर्गनिर्मित व मानवनिर्मित** अशा दोन गटात विभागणी केली जाते. निसर्गनिर्मित वस्तू वा घटना या स्वयंभू असल्यामुळे त्यांची निर्मिती निर्हेतुक अशीच असते. उदा. पौर्णिमेच्या रात्रीची अथवा इंद्रधनुष्याची निर्मिती मुद्दाम कोणाला रिझवण्यासाठी किंवा पावसाळी रात्र अथवा वादळाची निर्मिती कुणाला भीती दाखविण्यासाठी झालेली नसते. या उलट मानवनिर्मित वस्तू अथवा घटनांचे असते. त्यांची निर्मिती माणसाने केल्यामुळे त्यामागे **आपोआप निर्मितीहेतू** येत जातो.

माणसाकरवी होणारी निर्मितीही पुन्हा **व्यवहारोपयोगी आणि कलांची निर्मिती** अशा दोन भागांत विभागली जाते. या दोनही भागांतील निर्मितीमागे जीवन सुकर होणे हाच हेतू असतो. कलेची निर्मिती माणसाने नेमकी केव्हा केली हे सांगता येत नसले तरी प्राथमिक गरजांची यथोचित पूर्ती झाल्यानंतरच या कलेच्या निर्मितीकडे माणूस वळला असावा, असे म्हटले जाते. निसर्गातील दृश्य, रंगसंगती, आवाज यामुळेच माणसाला चित्र वा संगीत या कलांची जाणीव झालेली असावी. बाह्यसाधनांच्या वापरातून चित्रशिल्पादी कला जन्मल्या. स्वशरीरगत अशा साधनांच्या वापरातून नृत्य कला जन्मली. साहित्याचा जन्म मात्र भाषेच्या जन्मानंतर झाला हे नक्की. भाषेच्या जोरावरच माणूस निसर्ग व जीवन यांच्या प्रतिकृती उभ्या करू लागल्या. यासाठी माणसाने आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून स्वत:च्या अपूर्णतेला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला. हे लक्षात घेऊनच पुढे **प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी 'कला म्हणजे निसर्गाची अनुकृती'** हा सिद्धांत मांडला.

**साहित्यनिर्मितीच्या संदर्भात** माणसाचे जीवनानुभव हीच त्याची खरी शिदोरी होती. या जीवनानुभवांनाच शब्दांच्या आधारे मूर्त करण्याचे काम माणसाने केले. हे करताना त्याने फक्त प्रतिकृती तयार केली नाही. कारण तसे झाले असते तर ती नवनिर्मिती झाली नसती. **कलेची अनुकृती ही सर्जनशील आहे,** कला म्हणजे निसर्गाची अनुकृती असे **ॲरिस्टॉटलने** त्या बाबतीत जे सांगितले ते महत्त्वाचे आहे. म्हणून साहित्य ही नेहमीच एक नवनिर्मिती असते. **'आहे तसे दाखविले'** असे त्याचे स्वरूप नसून **'भावले तसे दाखविले'** असे साहित्याचे स्वरूप असते. साहित्य लेखनात अनुभव नुसते जसेच्या तसे सांगितले जात नाहीत तर त्यांची स्वतंत्र फेरमांडणी

केली जात असते. त्यांची लावली जाणारी नवी संगती, नवा अर्थ त्या त्या साहित्यकृतीत जाणवतो. अशा प्रकारे साहित्याच्या नवनिर्मितीची प्रक्रिया दिसून येते.

**साहित्यनिर्मितीच्या शक्ती :**

कवी किंवा लेखक हा सर्वसामान्य माणसासारखाच असतो. त्याच्या गरजा आणि जीवनव्यवहार इतर चारचौघांसारखेच असतात. मात्र कलावंत वा लेखक साहित्याची जशी निर्मिती साधू शकतो तशी निर्मिती इतर लोक साधू शकत नाहीत. तेव्हा इतरांपेक्षा लेखक – कवी यांच्याकडे साहित्यनिर्मितीच्या ज्या विविध शक्ती आढळतात त्या पुढीलप्रमाणे.

**१.प्रतिभा – Genius**

अनेक संस्कृत व पाश्चात्य विचारवंतांनी साहित्य निर्माण करणारी लेखकाजवळची शक्ती म्हणून प्रतिभेचा उल्लेख केला आहे. **दण्डी** या संस्कृत मीमांसकाने प्रतिभेचे वर्णन करताना **नैसर्गिकी (जन्मजात) आणि पूर्ववासनागुणानुबंधी** (पूर्वजन्माच्या संस्कारांचा परिणाम) असे शब्द वापरले आहेत. म्हणजे प्रतिभा प्रयत्नांनी प्राप्त होणारी नव्हे. अर्थात एखाद्याने जाणीवपूर्वक प्रतिभेची उपासना केली तर त्याच्यावर तिची थोडीतरी मेहेरनजर झाल्याशिवाय राहात नाही हे प्रयत्नांचे महत्त्वही दण्डी नाकारीत नाही. **हेमचंद्र** हा संस्कृत मीमांसक **'प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा'** अशी प्रतिभेची व्याख्या करतो. याचा अर्थ जुन्या परिचित विषयांना नवनवीन रूपे देणारी बुद्धी असा सांगितला जातो. **जगन्नाथ** यांच्या मते **'काव्यरचनेस अनुकूल अशी शब्दार्थांची मांडणी जिच्यामुळे कवीला करता येते ती शक्ती म्हणजे प्रतिभा होय.'** तर **अभिनवगुप्त** हा प्रतिभेला **'अपूर्ववस्तूनिर्माणक्षम प्रज्ञा प्रतिभा'** असे म्हणतो. म्हणजे पूर्वी कधीही नसलेल्या नवीन वस्तूंची निर्मिती करण्याचे सामर्थ्य जिच्यात आहे अशी शक्ती म्हणजे प्रतिभा होय.

**राजशेखर यांनी प्रतिभेचे १) कारयित्री प्रतिभा व २) भावयित्री प्रतिभा** असे दोन प्रकार सांगितले आहेत. कारयित्री प्रतिभेचा संबंध हा कवी किंवा लेखकाशी असतो. या प्रतिभेचा वापर करून कवी किंवा लेखक साहित्यनिर्मिती करीत असतो. भावयित्री प्रतिभेचा संबंध हा वाचक, समीक्षक, विश्लेषक यांच्याशी असतो. अर्थात, कवीने निर्मिलेल्या काव्याचे रसग्रहण करण्यासाठीची प्रतिभा म्हणजे भावयित्री प्रतिभा होय. ही प्रयत्नांनी प्राप्त करता येऊ शकते.

**थोडक्यात** वरील संस्कृत मीमांसकांच्या मताचा सारांश असा की, प्रतिभा ही काव्यनिर्मितीतील महत्त्वाची शक्ती असून, जी जन्मजात प्राप्त होते, तसेच ती संस्कारांनी प्राप्त करता येऊ शकते.

**प्रतिभेचे कार्य :**

कवीच्या वास्तव जीवनातील अनुभवांना नवे रूप, नवा अर्थ, नवा संदर्भ देणाऱ्या या प्रतिभेचे अंतरंग उलगडणे ही कठीण गोष्ट आहे. तरीही **सूक्ष्म सौंदर्यदृष्टी आणि उज्ज्वल कल्पनाशक्ती** हे तिचे विशेष मानण्यात येतात. एक नवीन अपूर्व विश्व निर्माण करण्याचे तिचे सामर्थ्य लक्षात येत असल्याने आणि त्याच वेळी तिच्या स्वरूपाचा नेमका अंदाज लागत नसल्यामुळे तिला दीर्घकाळापर्यंत परमेश्वरी देणगी मानण्यात आले.

प्रतिभेला अलौकिक शक्ती मानले गेले याचे कारण तिचे **विरलत्व.** तिचे अस्तित्व फारच थोडयांच्या ठिकाणी जानवते. त्यामुळे लेखक कवींनाही तो ईश्वरी कृपाप्रसाद वाटतो. उदा. **'आम्ही कोण म्हणुनि काय पुसता? आम्ही असू देवाचे लाडके....'** असे **केशवसुतांनी** म्हटलेले आहे.

प्रतिभेबाबत मानसशास्त्रीयदृष्टया काही विशेष सांगितले जातात. काहींनी प्रतिभावंताच्या ठिकाणी निर्मतीक्षमतेबरोबर एक **विक्षिप्तपणा** आढळत असतो असे म्हटले. तर काहींना प्रतिभा म्हणजे एक मानसिक विकृतीच वाटते. मात्र **कोलरीज** या पाश्चात्य विचारवंताच्या मते असा विक्षिप्तपणा प्रतिभावंताच्या ठिकाणी असला तरी त्याला मानसिक विकृती म्हणता येणार नाही. प्रसिद्ध **इटालियन मानसशास्त्रज्ञ लोंब्रोसा** याने प्रतिभेला वेडाची बहिण म्हटले आहे. **शेक्सपिअरनेही** कवी, प्रेमिक आणि वेडे यांना एकाच पंक्तित बसविले आहे. **डॉ. जॉन्सन** हा इंग्रजी कवी रस्त्याने चालताना नेहमी कडेचे खांब मोजत असायचा असे सांगतात तर आपल्याकडील बालकवी तर कवितेच्या भारावलेल्या मन:स्थितीत रेल्वे रूळावरून चालताना मागून आलेली रेल्वे न समजल्याने चिरडून ठार झाले असेही सांगितले जाते. अर्थात कवीची ही मन:स्थिती म्हणजे वेडेपणा नव्हे. कारण वेडा हा दुर्दैवाचा बळी मानला जातो तर कलेचे वेड लागणे **(सूक्ष्मातिसूक्ष्म भाव टिपण्याची दृष्टी)** ही गोष्ट भाग्याची समजली जाते.

**२.स्फूर्ती Inspiration**

'स्फूर्ती' ही मनाची एक अतिशय उत्कट अशी अवस्था मानली जाते. तसेच ती निर्मितीच्या जाणिवेने संपूर्णपणे भारलेली कविमनाची अवस्था असते. स्फूर्ती ही कलेच्या किंवा काव्याच्या निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. कवीला किंवा लेखकाला त्याच्या विमनस्क अनुभूतीतून सापडलेले कथाबीज, काव्यबीज

किंवा साहित्यानुभव हा साहित्यातून मांडला जावा, अशी त्याच्या मनाची अवस्था होते. तेव्हा तिला स्फूर्ती असे म्हणतात. कवीच्या मनातील अनुभवांना प्राप्त होत असलेला नवा संदर्भ सहज उद्रेकाने बाहेर पडावा लागतो. त्याला नेमके तोंड फुटण्याच्या दृष्टीने स्फूर्तीची आवश्यकता असते.

इंग्रजी कवी वर्डस्वर्थ याने कवितेची व्याख्या करताना 'Poetry is spontaneous overflow of powerful feelings' **(उत्कट भावनांचा सहज उत्स्फूर्त उद्रेक)** असे म्हटले आहे. 'सांगावेसे वाटणे याहून 'सांगितलेच पाहिजे' किंवा 'सांगितल्याशिवाय राहावतच नाही' अशा मन:स्थितीची अपेक्षा कवीबाबत अपेक्षित असते, ही स्फूर्तीचीच स्थिती होय.

अ. वा. कुलकर्णी म्हणतात, **'स्फूर्ती ही स्वतंत्र शक्ती नव्हे, तो प्रतिभेचा एक उत्कट भाग होय. उत्कट आवेगी असली, तरी ती** प्रतिभेसारखी टिकणारी अवस्था नसते. क्षणार्धात कवीचे अंतरंग उजळून टाकण्याचे तिच्यात सामर्थ्य जरूर असते. पण, ते क्षणार्धापुरतेच.' स्फूर्तीने जागृत झालेला तो क्षण प्रतिभेने पकडावा लागतो. त्यानंतर साहित्यनिर्मिती होते. अ. वा. कुलकर्णी म्हणतात, 'लहरीपणा हा स्फूर्तीचा खास विशेष आहे. हव्या त्या क्षणी हुकमीपणाने ती जागृत व कार्यकारी होऊ शकत नाही. कवीला नेहमीच तिच्या कलाने घ्यावे लागते. तशी ती प्रयत्न वा अभ्यास इत्यादी इतर गोष्टींनी प्राप्त होणारी स्थिती नव्हे. ती स्थलकालावरही अवलंबून नसते. कवीच्या ठिकाणी तिचा उद्‌भव कुठेही व केव्हाही होऊ शकतो आणि एकदा तो झाला की, कवीला तिच्या आहारी जावेच लागते. त्या क्षणापुरता तो नेहमीचा माणूस राहत नाही.' हे अगदी खरे आहे. पण, स्फूर्ती जागृत होण्यापूर्वी निश्चित काहीतरी घटना घडते. बऱ्याचदा जी बाह्यजगात घडते, तर काही वेळा ती घटना कवीच्या मन:पटलावर घडत असते आणि त्याचा झटका (stroke) बसतो आणि स्फूर्ती जागृत होते.

स्फूर्तीचे कार्य :

साहित्यनिर्मितीत 'स्फूर्ती'चे कार्य अतिशय महत्त्वाचे असते. कवी, लेखकाचा अस्सल जीवनानुभव ज्या वेळी असा दाटून आलेल्या 'स्फूर्ती'तून निर्माण झालेला असतो, त्या वेळी तो अस्सल, वाचकांच्या भावयित्री प्रतिभेला भावणारा, जागृत करणारा आणि निखळ रसास्वाद छेणारा ठरतो.

अनेकदा या **स्फूर्तीच्या क्षणी काव्यरचनाही होत नाही. पण ही स्फूर्ती सुप्त प्रतिभेला चालना मात्र जरूर** देते. खंडकाव्ये, दीर्घ कविता, कादंबरी यांच्याबाबतीत तर त्यांचा प्रारंभिक भागच स्फूर्तिजन्य म्हणू असा असतो. भावकविता कदाचित स्फूर्तीच्या झटक्यात पुरी होऊ शकेल पण दीर्घरचनाबद्दल असे आढळत नाही. **हरिभाऊ**

**आपटे यांनी** स्फुटकथा कदाचित एका भरात व अल्पकाळात लिहिल्या असतील पण सामाजिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन मात्र दीर्घकाळ घेऊन शांतचित्तानेच झालेले आहे. **गो.ब.देवल** यांनी जरठकुमारी विवाहाची वर्तमानपत्रातील दोन ओळींची बातमी वाचमन आलेल्या स्फूर्तीने 'संगीत शारदा' या नाटकाची निर्मिती केली. मात्र स्फूर्तीला प्रतिभेची जोड आवश्यक आहे किंबहुना प्रतिभावंतालाच स्फूर्ती येते.

**३. कल्पनाशक्ती : Imagination**

**कल्पनाशक्ती म्हणजे नवनिर्मिती साधणारी सर्जनशक्ती. कल्पनाशक्ती** ही प्रतिभेचे एक महत्त्वाचे अंग असते. तिच्या कार्यात **धारणशक्ती आणि स्मरणशक्ती** यांनाही महत्त्वाचे स्थान असते. मानवी मनावर नेहमी नानाविध संस्कार होत असतात तसे ते विस्मृतीतही जात असतात. मात्र स्मरणशक्तीच्या जोरावर त्यातील अर्थपूर्ण संस्कारांची लेखक पुनर्निर्मिती करीत असतो. हे कार्य धारणा आणि स्मरण या दोन शक्तींच्या साह्याने कल्पनाशक्ती जे कार्य करते हाच कवी व्यापार होय.

**कल्पनेचे कार्य :**

वर म्हटल्याप्रमाणे अमूर्ताला मूर्त रूप देण्याचे कार्य कल्पनेने साधले जाते. विशेषत: पौराणिक, ऐतिहासिक, घटनांचे चित्रण करताना पात्र, घटना, प्रसंग, परिसर लेखक कल्पनेने साकार करू शकतो. केवळ ऐतिहासिक नव्हे; तर समकालीन घटना, प्रसंग, पात्रचित्रण, परिसर यांचे स्फूर्तीच्या अवसीतून बाहेर आल्यावर पुनर्गठन करताना कल्पनेचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते. सामान्यत: कुठलेही भावगीत व भावकविता कल्पनाचित्रांच्या भाषेतच बोलतात. हे कल्पनाशक्तीचे कार्य प्रामुख्याने कवितेत दिसते. **उदा. बालकवींची** फुलराणी कविता.

''हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालींचे
त्या सुंदर मखमालीवरती फुलराणी ही खेळत होती''

या काव्यातील कल्पनेत कवीने जीव ओतला आहे. संध्याकाळी वेलीवर डोलणाऱ्या कळीचे एका अद्‌भूतक्षणी फुलराणीत रूपांतर होते. एका वेगळया अलौकिक पातळीवर कवीने फुलराणीच्या सृष्टीची उभारणी केली आहे. त्या सृष्टीमध्ये सामील झाल्यानंतर आपणही फुलराणीच्या प्रणयकथेत विलीन होऊन जातो. तिचे भावविश्व कवीने जिवंत साकार केले आहे. कल्पनात्मक निर्मितीमध्ये प्रतिमा आणि आशय अभिन्न झालेली असतात आणि हे कार्य फक्त कल्पनाशक्तीच करू शकते.

### ४) चमत्कृती : Fantasy

साहित्याच्या निर्मितिप्रक्रियेत लेखकापाशी असलेली मन:शक्ती म्हणजे चमत्कृती. चमत्कृतीचा विचार हा कल्पनाशक्तीच्या विचारांशी निगडित आहे. त्यामुळे तिचा विचार नेहमी कल्पनाशक्तीच्या संदर्भात केला जातो. इंग्रजी कवी कोलरिजने १) चमत्कृतिशक्ती २) प्रथमश्रेणीची कल्पनाशक्ती ३) द्वितीयश्रेणीची कल्पनाशक्ती अशा तील मन:शक्ती कल्पिल्या आहेत. या तिन्ही शक्ती संश्लेषणाचे कार्य करतात. कोलरिजच्या मते कल्पनांशी केलेली वैचारिक चमत्कृतीपूर्ण क्रीडा म्हणजेच 'चमत्कृती' होय. 'स्थलकालाच्या व्यवस्थेतून मुक्त झालेली, स्मृतीचाच एक प्रकार असलेली, बुद्धिनिष्ठ जड सामग्रीच्या समवेत सापडणारी व साहचर्याच्या नियमानुसार अनिर्बंध, यांत्रिक असे संवेदनांचे संश्लेषण करणारी जी एक मन:शक्त, तिला चमत्कृतिशक्ती असे म्हणता येईल.

चमत्कृतीचे कार्य :

चमत्कृतिशक्तीचे स्वरूप कसे असते व तो काव्यनिर्मितीच्या व्यापारात कोणते कार्य करते, ते आता पाहता येईल. चमत्कृतिशक्ती नवनिमिर्मती करू शकत नाही. मात्र स्मरणशक्तीप्रमाणेच जे पूर्वी अनुभवले ते पुन्हा मनासमोर आणण्याचे कार्य ती करू शकते. यात एक प्रकारचे कल्पनांचे एकत्रिकरण अभिप्रेत आहे. कल्पनासाहचर्याकडून जशी स्मरणशक्तीला सामग्री पुरविली जाते, तशी चमत्कृतीलाही पुरविली जाते. येथे कवीचे पूर्वानुभव साहचर्याने, तर्काने जागृत होतात. ते प्रामुख्याने बुद्धीशी संबंधित असतात, तशी चमत्कृतिशक्तीचा विलास हा भावनेशी संबंधित असतो. त्यामुळे या दोन शक्तीत भेद असल्याचे तो मानतो व त्यांचा निर्देश करण्यासाठी दोन वेगवेगळया संज्ञा वापरतो. 'वेड' आणि 'वात' यांच्यात जितका मोठा फरक, तितकाच मोठा फरक या दोन शक्तीत असतो. वात झालेल्या माणसाच्या बोलण्यात एक प्रकारची चुकीची का होईना संगती असते; घातात ती नसते. वात म्हणजे स्थलकालाची बंधने तोडून भरकटणारी स्मृती असते व चमत्कृतीचे स्वरूप असेच असते. एका मागोमाग एक अशी प्रतिमांची उधळपट्टी काव्यामध्ये दिसून येते. एकदा जे अनुभवले त्याचा पुन:प्रत्यय करून देण्याचे कार्य चमत्कृतिशक्तीकडून होते. कल्पनादिकांची विपुलता व विविधता निर्माण करण्याचेही कार्य ती काव्यामध्ये करीत असते. उदा. विनोदी साहित्यलेखन, वात्रटीका किंवा श्लेष अलंकाराचा काव्यातील वापर कवी, लेखकाजवळच्या चमत्कृती शक्तीममुळेच शक्य होतो.

**साहित्यिकाच्या व्यकितमत्त्वात ंआढळणारी गुणवैशिष्टे स्पष्ट करा.**

**व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ?**

मानवाचा विकास होत असताना अनुवंश, भोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती यांचा महत्त्वाचा वाटा असतो. माणूस जन्मापासून मृत्यूपर्यंत ज्या समाजात वाढतो, त्याचा परिणाम त्याची अभिरूची, बौद्धिक सामर्थ्य, सवयी, श्रद्धा व मूल्ये विकसित होण्यावर होतो. या सर्व वैशिष्टयांचे संघटित मूळ किंवा समग्र रूप म्हणजे 'व्यक्तिमत्त्व' होय. **मन** (Munn) या मानसशास्त्रज्ञाच्या मते, 'मनुष्याची शरीररचना, त्याच्या वर्तनपद्धती, अभिरूची, अभिवृद्धी, बौद्धिक सामर्थ्य व निरनिराळया योग्यता, पूर्ववत्ती आणि इतर प्रवाह वैशिष्टयांच्या समय संघानाला किंवा सलिष्ट रूपाला व्यक्तिमत्त्व असे म्हणतात.

**साहित्यिकांचे व्यक्तिमत्त्व :—**

लेखक – कवी आपल्या साहित्यातून एका अर्थाने आत्माविष्कार करीत असतो. हा आत्माविष्कार म्हणजे लेखक – कवीचे एकाअर्थी व्यक्तिमत्त्व असते. ते त्यांच्या साहित्यलेखनातून व्यक्त होते. त्यामुळे 'साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व' असा शब्दप्रयोग करीत असताना सामान्य माणसाहून साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व वेगळे असते का, असू शकते का, असे प्रश्न आपणांस सहाजिकच पडू शकतात. साहित्यिक हा देखील एक माणूस असतो. त्यामुळे सर्वसामान्य माणूस आणि साहित्यिक यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये गुणात्मकदृष्टया काहीएक प्रमाणाचा फरक, भेद असू शकतो. तो पुढीलप्रमाणे –

**१ .संवेदनक्षमता –**

कवी, लेखकांचे जे गुणविशेष सांगितले जातात, त्यामध्ये संवेदनशीलता हाही महत्त्वाचा असा विशेष गुण सांगितला जातो. सामान्य माणूस संवेदनक्षम, संवेदनशील असतो. पण, त्याहून अधिक संवेदनक्षमता साहित्यिकांकडे असते. 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास पकडता येणे केवळ संवेदनक्ष माणसाला शक्य असते. संवेदनक्षमता म्हणजे हळवेपणा नसून कोणत्याही अनुभवातील सूक्ष्मातिसूक्ष्म बारकावे टिपण्याची क्षमता होय. संवेदनशीलतेत पुढील गोष्टींचा समावेश केला जातो.

१. दुसऱ्याच्या दु:खाबद्दलची जाणीव निर्माण करणे.

२. स्वत:च्या दु:खाबद्दल हळवेपणा वाटू लागणे.

३. सौंदर्याला प्रतिसाद देण्याची वृत्ती वाढीला लागणे.

४. संवेदनामध्ये रंगून जाण्याची वृत्ती असणे.

५. वरील घटकांना, गोष्टींना अनुरूप असा भावभावनांनी प्रतिसाद देण्याची तत्परता दाखविणे.

कवी हा नवनिर्मिती करणारा असल्यामुळे या संकेताच्या पलिकडे गेल्याशिवाय त्याला गत्यंतर नसते. त्याच्या अनुभवाला व्यक्त करण्यासारखे रूप प्राप्त होते, ते त्याच्या संवेदनशीलतेमुळे. ती नेहमीपेक्षा अधिक ऐंद्रिक असते. याचा अर्थ तिला रंग, गंध, नाद, स्पर्श आणि स्वाद या संवेदना अधिक तीव्रतेने आणि त्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटांसह जाणवतात. पण, कवीला त्या केवळ जाणवून भागणार नाही, त्या त्याला शब्दातून व्यक्त करता आल्या पाहिजेत. म्हणजे शेवटी ही संवेदनशीलता भाषेशी निगडित होते. उदा. बालकवींची कविता.

'सौंदर्याच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे । चैतन्याच्या कोवळया उन्हात हिंडावे'

अशा प्रकारची संवेदनक्षमता बालकवींकडे असल्यामुळे त्यांनी अप्रतिम काव्यलेखन केले. कवीची कल्पनाशक्ती ही त्याची संवेदनक्षमता घडविणारी आणि तिच्या आधारे अनुभवांचा अर्थ लावणारी आधारभूत शक्ती असते. प्रत्यक्ष साहित्यनिर्मितीच्या क्षणी ती अतिशय उत्कट आणि अधिक कार्यक्षम होते. तसेच कवीच्या अनेकविध जाणिवा मिळूनही त्याची संवेदनक्षमता निर्माण होत असते.

अनेकदा असे होते, की कवीची संवदेनक्षमता एकदा स्थिरावली की त्याच्या लेखनात कलात्मकता उरत नाही किंवा काही वेळा कवी आपल्या संवेदनक्षमतेतील एखाद्या जाणिवेवरच प्रेम करू लागतो आणि मग त्याची कविता अधिकच एकांगी होते. तसेच तो एखाद्या साहित्यिक परंपरेस नाते जोडत असल्यास त्यावा परिणामही त्याच्या कवितेवर होतो.

याशिवाय व्यक्तीच्या संवेदनक्षमतेबरोबर एखाद्या काळाचीही एक सर्वसाधारण संवेदनक्षमता तयार होत असते. एका विशिष्ट तऱ्हेने अनुभवांचे निरीक्षण, त्यांचा स्वीकार, त्याची लावली जाणारी संगती ही काही काळात समानपणे सर्व कवींच्यात वावरताना दिसते. उदा. अर्वाचीन कवितेचा, रविकिरण मंडळाचा, नवकवितेचा अथवा दलित साहित्यप्रवाहाचा काळ इ.

**२. शैशववृत्ती –**

संवेदनक्षमतेप्रमाणे शैशववृत्ती हाही एक गुणविशेष सांगितला जातो. लेखक – कवींना जीवनात आपल्या बालपणातील निर्वाज्य, सहज–सुलभ असा मनाचा भाव, निरागसपणा कायम जपून ठेवावे, असे म्हटले जाते. सभोवतालचे लहान मुल आपल्या अंगभूत अशा शैशवगुणाने पाहत असते. तशीच वृत्ती साहित्यिक जपत

असतो. त्यांनी ती जपावी, अशी एक धारणा होऊन गेली आहे. साहित्यिकाच्या बाबतीत प्रौढ वयातसुद्धा शैशववृत्ती म्हणजे बालपणीचा स्वभावविशेष हा टिकून राहिला पाहिजे असे नेहमी सांगण्यात येते. म्हणून तर आधुनिक मराठी काव्याचा जनक म्हटले गेलेले कवी केशवसुत यांनी **'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा'** असे म्हटले आहे. त्यामागेही हीच भावना, विचार असल्याचे दिसून येते. याचा अर्थ इतकाच की, कवित्वास आवश्यक अशा वृत्तीचा ताजेपणा, संवेदनक्षमता, निरागसता इत्यादि विशेष कवीच्या ठिकाणी कायम राहिले पाहिजेत. हे वृत्तिविशेष माणसाच्या ठिकाणी बालवयात असतात. बालपण सरून माणूस जसजसा मोठा होत जातो तसतसे हे विशेषही कमी होत जातात. परिणामी माणसाच्या ग्रहण क्षमतेतील नेमकेपणा व सूक्ष्मता मंदावत जाते. या साऱ्याचा काव्यातील शैशववृत्तीवर विपरित परिणाम होऊ शकतो. तेव्हा 'इतर सर्वसामान्य माणसे जशी मोठेपणी रूढ पद्धतीने अनुभव घेतात, तसे कवी अथवा लेखकाने न घेता बालकाच्या मनोवृत्तीने विचार करायला हवा यालाच शैशववृत्ती असे म्हणतात.'

लहान मुले संवेदनांचा अनुभव घेताना त्या संवेदनांची व्यवस्था रूपक प्रक्रियेतून लावतात. सर्वच लहान मुलांत वस्तूंचे सजीवीकरण (Animetion) करण्याची प्रवृत्ती दिसून येते. लहान मुले दोन वस्तूंची तुलना कधी करीत नाहीत तर त्यात फक्त एकात्मता पाहतात. त्यांच्या मनात विविध संवेदना या रूपकाच्या पद्धतीने प्रस्थापित होतात. उदा. आपल्या भावाला वहिणी आणायला सांगणारी मुलं एकमेकांशी कसे बोलतात, हे आपल्यापैकी बहुतेकांना परिचयाचे आाहे.

'वहिणीला आणायला चांदोबाची गाडी, चांदोबाच्या गाडीला हरणांची जोडी
हरणांची जोडी तुडवे गुलाबाचे रान, दादा मला एक वहिणी आण'

हे बालकाचे कल्पनाविश्व कवी ग. दि. माडगुळकरांनी त्या बालविश्वातल्या वातावरणात जाऊन कल्पिले आहे. हीच कवी अथवा लेखकाची शैशववृत्ती होय. प्रौढावस्थेतही अशा प्रकारची शैशववृत्ती जपणे म्हणजेच विशिष्ट अशी काव्योपयोगी मानसिकता जपण्यासारखे आहे.

**३. अनुभवसमृद्धी –**

साहित्यिकांच्या व्यक्तिमत्त्वामधील असणाऱ्या गुणविशेषांमध्ये अनुभवसमृद्धी याही विशेषाला महत्त्व आहे. कवी – लेखक जेव्हा साहित्यनिर्मिती करीत असतो, तेव्हा तो आपणाला आलेल्या अनुभवालाच शब्दरूप देत असतो. त्यामुळे संत तुकारामांसारखा कवी, 'अनुभव आले अंगा, तया जगार देतसे' असे म्हणू शकतो. जीवन

जगत असताना सामान्यांना जसे अनुभव येतात, तसेच कवी—लेखकांनाही येतात; परंतु कवी—लेखकांचे अनुभव काव्याचे, साहित्याचे रूप धारण करतात. साहित्यिकांच्या अनुभवांच्या समृद्धीवर त्यांच्या साहित्यनिर्मितीचे स्वरूप अवलंबून राहते. एका परीने श्रेष्ठ अशा साहित्यकृतीतून त्या कवी—लेखकाची अनुभवाची समृद्धीच प्रतिबिंबित होत असते.

अनुभवसमृद्धी म्हणजे गुणात्मदृष्टया अनुभवसमृद्ध असावा लागतो. उदा. **'केल्याने देशाटन'** या प्रवासवर्णपर पुस्तकात रा. भि. जोशी यानी प्रवासाचे माहात्म्य अर्थपूर्ण पद्धतीने सांगितले आहे. ते एखाद्या रेल्वेगार्डला किंवा एस.टी.बसच्या कंडक्टरला सांगता येणार नाही. तेव्हा क्षेत्र व खोली या दोन दृष्टींनी अनुभवसमृद्धीचा विचार केला जातो. लेखक श्री. व्यं. केतकर यांनी **हरिभाऊ आपटे** यांच्या सामाजिक कादंबऱ्यांना 'सदाशिवपेठी कादंबरी' म्हणून हिणवले. त्यांच्या मते हरिभाऊंचे अनुभवविश्व मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्री — जीवनापुरतेच मर्यादित आहे. जवळजवळ सर्वच मराठी लेखकांच्या बाबतीत 'अत्यंत मर्यादित अनुभवक्षेत्र' हा घेतला जाणारा आक्षेप आहे. १९ व्या शतकातील बहुतांश लेखक मध्यमवर्गीय ब्राह्मण जातीतील होते. त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व आपोआपच त्यांच्या सामाजिक स्तराने सीमित झालेले दिसते. या उलट स्टाइनबेग, हेमिंग्वे, अशा इंग्रजी लेखकांचे अनुभवक्षेत्र व्यापक आणि विशाल असल्याचे दिसते.

लेखनात अपरिचित व विविधतापूर्ण अशा अनुभवांच्या केवळ दर्शनाची अपेक्षा नसते. तर अनुभवविश्वाचे जिवंत, चैतन्यमय दर्शन घडणे महत्त्वाचे असते. येथे आणखी एका प्रश्नाचा विचार होतो की, लेखकाचा अनुभव प्रत्यक्षातीलच हवा की नको. जर प्रत्यक्षातील अनुभव नसेल तर त्या जीवनाचे चांगले चित्रण तो करू शकत नाही हे सत्य आहे. पण साहित्याच्या बाबतीत प्रत्यक्षानुभव एका मर्यादेपर्यंत मदत करीत असतो. तो असेल तरच साहित्य चांगले उतरू शकते असे म्हणता येत नाही. त्यामुळे फार तर तपशिलाच्या चुका होणार नाहीत. पण येथे हे ही लक्षात घ्यायला हवे की लेखकानक घेतलेले प्रत्यक्षातील अनुभव शेवटी कल्पनेच्या पातळीवर नेल्याशिवाय कलात्मक होत नाहीत. तसेच प्रत्यक्षातील अनुभव हवा हा मुद्दा फार ताणला तर पुरूषाला स्त्रीचे किंवा स्त्रीला पुरूषांचे चित्रण करणे कठीण होईल. **उदा. शंकर पाटलांची 'वेणा' नावाची** कथा आहे. प्रसूतिवेदना म्हणजे वेणा असा अर्थ घ्यानी घेतला तर पाटलांची ही कथा मुळातच रद्द करावी लागेल. तेव्हा लेखकाजवळ असणाऱ्या अनुभवाचे कलानुभवात रूपांतर होणे व त्यांना एक आशय आणि संदर्भ लाभणे महत्त्वाचे असते. अनुभवाची समृद्धी म्हणतात ती हीच होय.

**४. विद्वता —**

साहित्यिकांच्या दृष्टीने बाकीचे गुणविशेष जसे महत्त्वाचे असतात, तसाच विद्वत्ता हाही गुणविशेष आवश्यक मानला जातो. 'विद्वत्ता' या शब्दाला समानार्थी म्हणून व्यासंग, पांडित्य हे शब्द योजले जातात. लेखक–कवींना जी साधना करावी लागते, ती एका अर्थाने त्याची ती विद्वत्ताच असते. अनुभवाला व्यासंगाची, विद्वत्तेची जोड असायला हवी. अनुभवाला, तिच्या समृद्धीला सहाय्य करणाऱ्या ग्रंथांचे वाचन, वाङ्मय परंपरेचे भान येण्यासाठी त्या–त्या साहित्यप्रकारातील महत्त्वाच्या, मैलाचा दगड ठरणाऱ्या आणि आपल्या साहित्यनिर्मितीने अव्वल स्थान निर्माण केलेल्या, परंपरेला छेद देणाऱ्या साहित्यकृतींच्या वाचनाची आवश्यकता आणि गरज तेवढीच महत्त्वाची ठरते. या सर्व ज्ञानाचा कवीला कळतनकळत उपयोग करून घेता येतो. त्यामुळे त्याच्या प्रतिभेला एक समृद्धपण प्राप्त होऊ शकते. एका अर्थाने त्याविषयी मिळविलेले ज्ञान, माहिती हा त्या साहित्यिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनून जातो.

साहित्यिक हा नवनिर्मिती क्षमता असणारा असावा. तसेच लेखनातील तपशिलासाठी तो बहुश्रुतही असावा. ही बहुश्रुतता विद्वत्तेच्या स्वरूपात असते. मात्र विद्वत्ता हा कवीचा विशेष आहे; असे म्हणता येणार नाही. उदा. जुन्या काळातील संत तुकाराम, चोखामेळा, कान्होपात्रा, जनाबाई यांच्याबरोबर अलिकडच्या काळातील बहिणाबाई चौधरी, अण्णाभाऊ साठे, उत्तम बंडू तुपे हे सर्व कवी लेखक विद्वान म्हणू असे नव्हते. तरीही विद्वता नसल्याने त्यांच्या कवित्वास अथवा लेखनास कुठेही बाधा आली नाही.

मात्र एक नक्की की, ज्या विश्वाची निर्मिती लेखक साधू पाहात आहे; त्याचे सर्वांगीण ज्ञान त्याला हवे. त्याशिवाय त्या विश्वाचे बारकावे टिपणे त्याला शक्य होणार नाही. कारण कल्पनात्मक अनुभव म्हटले तरी तो ज्ञानात्मक अनुभवाची जागा घेऊ शकत नाही. त्याच्या बुडाशी प्रत्यक्ष माहिती हवीच. उदा. ज्याला ग्रामीण जीवनाची काहीही माहिती नाही असा शहरी लेखक ग्रामीण जीवनावर काहीही गोलमाल लिहू शकेनही. पण त्याचे लेखन प्रत्ययकारी होणार नाही.

त्याचप्रमाणे त्याने साहित्यशास्त्राचे ज्ञान हस्तगत केले असेल तर तो स्वत:च्या व इतरांच्या साहित्याचे चांगले मूल्यमापन करू शकेल. मराठीतील माधव ज्यूलियन, बा. सी. मर्ढेकर यांनी चांगल्या तऱ्हेने समीक्षक व कवी यांच्या भूमिका बजावल्या आहेत. पण अशा साहित्यशास्त्राचे ज्ञान नसलेल्या बालकवींनीही उत्तम कविता लिहिल्या आहेत. त्यामुळे हा मुद्याही येथे गैरलागू ठरतो.

**तेव्हा चांगला शेतकरी व्हायला जसे कृषिशास्त्राचे ज्ञान हवेच असे नाही तसे चांगला लेखक कवी व्हायला हवी प्रतिभेची देणगी. विद्वत्ता हवीच असे नाही.**

**५. साहित्यिकांचा जीवनविषयक आणि साहित्यविषयक दृष्टिकोन –**

साहित्यिकांकडे जसे संवेदनक्षमता, शैशववृत्ती, अनुभवसमृद्धी, विद्वत्ता यांसारखे गुणविशेष असतात, तसाच त्यांच्याकडे असणारा जीवनविषयक आणि साहित्यविषयक दृष्टिकोन हा सुद्धा तेवढाच महत्त्वाचा असणारा गुणविशेष मानला जातो. हे सर्वच गुण एकमेकांना पूरक ठरत असल्याने लेखक–कवी यांच्याकडून साहित्यनिर्मिती होत असते.

समाजातील प्रत्येक व्यक्ती वेगवेगळे दृष्टिकोन ठेऊन वावरत असते आणि ते दृष्टिकोन त्याच्या कृती–उक्तीतून व्यक्त होतात. साहित्यिकाच्या बाबतीतही त्याचे जीवनविषयक व साहित्यविषयक दृष्टिकोन त्याच्या लेखननिर्मीतीत सहभागी झालेले असतात. उदा कवी केशवसुत, हरिभाऊ आपटे यांचा सुधारणावादी दृष्टिकोन, भा.रा.तांबे यांचा आनंदवादी दृष्टिकोन, ना.सी.फडके यांचा कलावादी दृष्टिकोन, वि. स. खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन त्यांच्या त्यांच्या लेखनातून दिसून येतात. अर्थात साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकाजवळ त्याचे त्याचे विशिष्ट दृष्टिकोन असले तरी लेखनात हवाबंद कप्पे निर्माण होतात; असे दिसत नाही. उदा. कलावादाचा पुरस्कार करणाऱ्या ना.सी.फडके यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेच्या हालचालींची पार्श्वभूमी आपल्या अस्मान, तुफान, शोनान या तीन कादंबऱ्यांमधून मांडली आहे.

साहित्य म्हणजे अनुभवांची कलात्मक पुनर्निर्मिती असते. हे सूत्र ध्यानी घेतले तर अनुभवांची संगती लावणाऱ्या मनाची घडण ज्या संस्कारजन्य दृष्टिकोनात होते त्याचाही विचार करावा लागतो. पण माणसाचे मन आणि मनाचा कलाव्यापार या गोष्टीही नीटपणे ध्यानात घेतल्या तर येथेही एकाच वळणाचे साहित्यरूप संभवते असे खात्रीलायक म्हणता येत नाही. कारण त्या क्षणाला माणसाचे मन व्यापून टाकणारी जाणीव प्रभावी होईल आणि माणसाचे मन कुठे झुकेल ते सांगता येत नाही. उदा. अशा क्षणीच एखादा जीवनवादी केशवसूत कलावादी 'सतारीचे बोल' नावाची कविता लिहितो. किंवा कलावादी भा.रा.तांबे 'रूद्रास आवाहन' अशी जीचनवादी कविता सांगून जातो. **तेव्हा साहित्यनिर्मितीत जीवनविषयक व साहित्यविषयक अशा दोन्ही दृष्टिकोनांचे एकात्म रूप दिसावे हे महत्त्वाचे.**

**सारांश :—**

साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वामधून आकाराला आलेले वरील गुणविशेष साहित्यनिर्मितीत कसे सहाय्यभूत ठरतात. त्या गुणांचे प्रतिबिंब, त्याचा आविष्कार साहित्यकृतीत कसा होतो? तो होताना उत्कटतेने, कलात्मकतेने कसा होतो? त्यातून कलाकृतीचे कलाकृतीपण सिद्ध होत राहते. याचा काहीसा प्रत्यय साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वामधून दिसणाऱ्या गुणविशेषातून येत राहतो.

.....................................................................................................................................

SDS Marathi